ठाणेनगर वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ७४१ /२०२६ दि. २९/०७/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, ठाणेनगर वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक २९/०७/२०२६ रोजी गुरूपौर्णीमा निमीत्त १२.०० वा.च्या दरम्यान मा. श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यंमत्री, महाराष्ट्र राज्य यांच्यासह शिवसेना पक्षाचे खासदार आमदार व कार्यकर्ते मोठया प्रमाणात आनंदआश्रम, टेंभीनाका, शक्तीस्थळ ठाणे येथे भेट देणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होवू नये, वाहतूक सुरळीत व सुनिश्चित होणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही. ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

प्रवेश बंद – १) सिव्हील हॉस्पीटल कॉर्नर व चरई कडून टेंभी नाका मार्गे टॉवर नाक्याकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **श्री भवानी चौक, टि.एम.सी. शाळा नं. १७, टेंभीनाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने टेंभीनाका येथून सरळ कोर्टनाका मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – २) टेंभी नाक्याकडून कोर्टनाका सर्कलकडून व आंनद आश्रम मार्गे टॉवर नाक्याकडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – सदरची वाहने डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथून डावे वळण घेऊन मुख्य बाजारपेठ मार्गे इच्छित स्थळी जातील.

प्रवेश बंद – ३) ठाणे रेल्वेस्टेशन कडून टॉवरनाका/टेंभीनाकाकडे येणारी सर्व प्रकारच्या बसेस व एस. टी. बसेस तसेच रिक्षा व चारचाकी लहान वाहनांना **चिंतामणी चौक (टॉवरनाका)** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग – ठाणे रेल्वे स्टेशन कडून सॅटिस ब्रिजवरुन येणाऱ्या परिवहनच्या सर्व एस. टी बसेस तसेच टि. एम. टी.च्या सर्व बसेस हया बी कॅबिन सॅटिज ब्रिजवरुन गोखले रोड मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच रिक्षा व चारचाकी लहान वाहने सॅटिज ब्रिज खालुन स्टेशन रोड आहिल्यादेवी पथ मार्गे इच्छित स्थळी जातील.

नो पार्किंग – टॉवर नाका ते टेंभीनाका, कोर्टनाका ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, जिल्हाधिकारी कार्यालय, श्रीभवानीचौक,टेंभीनाका ते ठाणे कोर्ट व कोर्ट परीसरर स्त्याच्या दोन्ही बाजुस वाहने पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर वाहतूक अधिसूचना दि.२९/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० ते रात्रौ २२:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/— सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

प्रत माहितीसाठी,

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
विभाग नियंत्रण, राज्य परिवहन, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,

सहायक पोलीस आयुक्त, ठाणे वाहतूक विभाग, पो.नि. ठाणेनगर वाहतूक उपविभाग.